ePaper

युरेनियमचा साठा जमिनीखाली लपवून इराणने उद्ध्वस्त केले बोगदे

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 14 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

भीमाशंकर येथे होणार 'हेरिटेज वाडी'

## भारतीय वायुदलाच्या विमान अपघातात 5 जवान शहीद

# "आई, नंतर निवांत बोलू.." पण..

**महाईन्यूज । आसाम**

**"आत्ता घाईत आहे, मोकळा झाल्यावर बोलतो..." आईशी व्हिडीओ कॉलवर बोलताना उच्चारलेले हे शब्दच फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार यांचे अखेरचे ठरले. त्यानंतर अवघ्या तासाभरात आसाममधील जोरहाट येथे भारतीय वायुसेनेच्या एएन-३२ विमानाच्या भीषण अपघातात ते शहीद झाले. या घटनेने बिहारमधील जहानाबाद जिल्ह्यासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.**



### २०२१ मध्ये भारतीय वायुसेनेत प्रवेश

शुभम यांच्या वीरमरणाची माहिती मिळताच त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. भाऊ सत्यम यांनी सांगितले की, सुरुवातीला ही अफवा असावी असे वाटले; मात्र शुभम यांच्या मोबाईलवर संपर्क साधल्यानंतर दुर्घटनेची अधिकृत माहिती मिळाली. त्यानंतर संपूर्ण गावात शोककळा पसरली.





हुलासगंज प्रखंडातील बनवारिया गावचे रहिवासी असलेले २६ वर्षीय शुभम कुमार यांनी शनिवारी सकाळी सुमारे ९ वाजता आपल्या आईशी व्हिडीओ कॉलवर संवाद साधला होता.

ते आनंदी दिसत होते; मात्र घाईत असल्याने "नंतर निवांत बोलू," एवढेच सांगून त्यांनी संभाषण संपवले. नियतीने मात्र त्यांना पुन्हा बोलण्याची संधीच दिली नाही.

या दुर्घटनेत फ्लाइट लेफ्टनंट शुभम कुमार यांच्यासह पाच जवान शहीद झाले, तर सहवैमानिक गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणाच्या चौकशीसाठी भारतीय वायुसेनेने उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत.

शेतकरी वडील अमरेंद्र आनंद आणि गृहिणी आई यांची अवस्था अत्यंत बिकट असून, वडील बोलण्याच्याही स्थितीत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. २०२१ मध्ये शुभम यांनी भारतीय वायुसेनेत प्रवेश केला होता. आपल्या मुलाच्या यशाचा कुटुंबाला मोठा अभिमान होता.

ग्रामस्थांच्या माहितीनुसार, कुटुंबीयांनी त्यांच्या विवाहाची स्वप्ने पाहिली होती. मात्र शुभम स्वतः विवाहास नकार देत होते. काही दिवसांपूर्वीच सुट्टी संपवून ते पुन्हा सेवेत रुजू झाले होते. घरातून झालेला तोच त्यांचा अखेरचा निरोप ठरला.

या दुर्घटनेबद्दल बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. "जोरहाट येथील एएन-३२ विमान दुर्घटनेत पाच वीर वायुसैनिकांचे निधन अत्यंत वेदनादायी आहे. त्यांच्या अदम्य शौर्य, कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रसेवेचे योगदान देश सदैव स्मरणात ठेवेल," अशा शब्दांत त्यांनी श्रद्धांजली वाहिली.

# पुण्यात गांजाचा काळाबाजार उघड

## सूस, कोथरूड परिसरात अमली पदार्थांचे जाळे सक्रिय; फोनवर ऑर्डर

**महाईन्यूज । पुणे**

**गांजा हवा आहे ? (फोन कट) समोरून पुन्हा फोन आला... किती हवाय? पाचशे रुपयांचा पाहिजे? पन्नास ग्राम मिळेल? सकाळी ११ ला मुंबई-पुणे हाय-वेवर या... सुसाट वेगाने सूस ब्रीज गाठले... ठरलेल्या ठिकाणी तो मोटारसायकलवर आला... फोन केला... खात्री पटताच त्याने पैसे मागितले. पाचशेची नोट देताच त्याने गांजाचे पाकीट हातात ठेवले अन् तो वाऱ्याच्या वेगाने पसार झाला.**



अशी होते पुण्यात गांजाची डिलीव्हरी... हा संवाद आहे टीम पुढारी, गांजाशौकीन आणि गांजा विक्रेत्याचा. शहरात गांजा आणि अमली पदार्थांचा काळाबाजार कशा प्रकारे फोफावला आहे, याचा रोमांचक पर्दाफाश 'टीम पुढारी'ने केला. मुळशी येथील रेव्ह पार्टीच्या पार्श्वभूमीवर, शहरातील सूस गाव आणि कोथरूड परिसरात अमली पदार्थांचे जाळे किती खोलवर पसरले आहे, याचे जिवंत पुरावे समोर आले आहेत. कॉलेज कट्ट्यांपासून ते अगदी महामार्गावरच्या टपऱ्यांपर्यंत गांजाची विक्री अत्यंत नियोजनबद्ध आणि पोलिसांच्या नाकाखाली सुरू आहे.

पोलिसांच्या सातत्यपूर्ण कारवाईमुळे गांजा विक्रेत्यांनी आता आपली विक्रीची पद्धत बदलल्याचे समोर आले आहे. आता गांजा खरेदी करणारे ग्राहक थेट पेडलर्सशी संपर्क साधून व्यवहार करत आहेत. अशाच एका गांजाशौकिनाने नाव व ओळख गुप्त ठेवण्याच्या अटीवर गांजा कसा मिळवला जातो, याची संपूर्ण प्रक्रिया पुढारीच्या प्रतिनिधीला दाखवून दिली.

गुरुवारी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास संबंधित व्यक्तीने एका पेडलरला फोन केला. सुरुवातीला पेडलरने गांजा विकण्यास नकार दिला. मात्र, काही वेळाने पुन्हा संपर्क साधल्यानंतर त्याने सुरक्षेची काळजी घेत गांजा देण्यास होकार दिला. त्यानंतर पेडलरने पुन्हा फोन करून किती प्रमाणात गांजा हवा आहे, याची विचारणा केली. त्यावर ५०० रुपयांचा गांजा हवा असल्याचे सांगण्यात आले. पेडलरने ५०० रुपयांत सुमारे ५० ग्रॅम गांजा मिळेल, असे सांगितले. त्यानंतर त्याने मुंबई-पुणे महामार्गालगत एका ठराविक ठिकाणी येण्यास सांगितले.

ठरलेल्या ठिकाणी पोहोचल्यानंतर काही वेळ प्रतीक्षा केल्यानंतर नंबरप्लेट नसलेल्या दुचाकीवर तोंड रुमालाने झाकून आलेला पेडलर तेथे आला. त्याने कोणतीही चर्चा न करता प्रथम पैशांची मागणी केली. पैसे मिळताच त्याने गांजाचे पॅकेट हातात दिले आणि काही क्षणांतच दुचाकीवरून तेथून पसार झाला.

या संपूर्ण प्रकारातून पोलिसांच्या कारवाईनंतर गांजा विक्रेत्यांनी आपली कार्यपद्धती अधिक गुप्त आणि सावध केल्याचे स्पष्ट होत आहे. थेट फोनवर संपर्क, ओळख पटवल्यानंतरच व्यवहार, ठराविक ठिकाणी क्षणात देवाण-घेवाण आणि तात्काळ घटनास्थळ सोडण्याची पद्धत अवलंबून पेडलर्स सर्रास गांजाची विक्री करत असल्याचे या स्टिंगमधून समोर आले आहे.

### कोथरूडमध्ये 'मोबाईल पेडलर्स'चा उच्छाद

कोथरूड आणि सिम्बायोसिस कॉलेजच्या परिसरात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी असते. याच गर्दीचा फायदा घेत अमली पदार्थ विक्रेत्यांनी (पेडलर्स) आपले जाळे विणले आहे. विशेष म्हणजे, कोथरूडमध्ये खरेदी-विक्रीसाठी कोणताही फिक्स स्पॉट नाही. हा सर्व धंदा फिरत्या गाड्यांवरून म्हणजेच 'मोबाईल पेडलिंग'द्वारे चालतो. ग्राहक आणि पेडलर यांच्यात मोबाईलवर संपर्क होतो. पेडलर ग्राहकांना फोन करून रस्त्यात कुठेतरी थांबायला सांगतो. ग्राहक पोहोचताच, गाडीवरून येणारा पेडलर क्षणात गांजाचे पाकीट हॅन्डओव्हर करतो, पैसे घेतो आणि पसार होतो.

---

## बॉम्ब धमकीनंतर महापालिकेत मंत्रालयासारखी कडक सुरक्षा; व्हिजिटर पास अनिवार्य

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेला नुकतीच ईमेलद्वारे उडवून देण्याची धमकी मिळाल्याने प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. प्रशासनाने तातडीने सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. आयुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि सर्व खातेप्रमुखांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत महापालिकेची सुरक्षा अभेद्य करण्यासाठी मंत्रालयाच्या धर्तीवर कडक नियमावली लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



### नागरिकांच्या बॅगा व सामानाची तपासणीला सुरुवात

नागरिकांच्या बॅगा व सामानाची तपासणीस सुरुवात करण्यात आली आहे. येणाऱ्या जाणाऱ्यांची नोंद ठेवण्याची आता व्यवस्था करण्यात येणार आहे. संबंधित व्यक्ती कोणत्या कामासाठी आली आहे, कोणत्या विभागात जाणार आहे आणि कोणत्या अधिकाऱ्याला भेटणार आहे, याची माहिती नोंदवूनच त्याला महापालिकेच्या आवारात आता प्रवेश दिला जाणार आहे. यासाठी 'व्हिजिटर पास' देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. वाढत्या सुरक्षा धोक्यांच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय न करता सुरक्षिततेची खात्री देणे आवश्यक आहे. त्यामुळे आधुनिक सुरक्षा निकषांनुसार नियमावली तयार केली जाणार असल्याचे स्थायी समितीचे अध्यक्ष भिमाले यांनी सांगितले.

महापालिकेत भेटीसाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला निश्चित नियमांचे पालन करावे लागणार आहे. यासाठी स्वतंत्र व सर्वंकष नियमावली तयार करण्याचे आदेश स्थायी समितीने प्रशासनाला दिले असून, पुढील दहा दिवसांत हा प्रस्ताव समितीसमोर सादर केला जाणार आहे. महापालिकेला नुकतीच बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्यानंतर पालिकेतील सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

महापालिकेत भेटीसाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला निश्चित नियमांचे पालन करावे लागणार आहे. यासाठी स्वतंत्र व सर्वंकष नियमावली तयार करण्याचे आदेश स्थायी समितीने प्रशासनाला दिले असून, पुढील दहा दिवसांत हा प्रस्ताव समितीसमोर सादर केला जाणार आहे. महापालिकेला नुकतीच बॉम्बस्फोटाची धमकी मिळाल्यानंतर पालिकेतील सुरक्षा व्यवस्थेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे.

बॉम्ब धमकीच्या घटनेनंतर महापालिकेतील सुरक्षा व्यवस्थेची तपासणी करण्यात आली. यात अनेक त्रुटी समोर आल्या. काही सुरक्षारक्षकांकडे वैध ओळखपत्रे नसल्याचे आढळून आले. काही जण केवळ दोरीला कार्डसदृश वस्तू लटकवून काम करत असल्याचे आढळले. त्यामुळे सुरक्षा यंत्रणेच्या विश्वासार्हतेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाला. त्यामुळे महापालिकेच्या विविध प्रवेशद्वारांवर सुरक्षा कठोर करण्यात आली आहे.

# भीमाशंकर येथे होणार ‘हेरिटेज वाडी’

## श्रीक्षेत्र भीमाशंकर परिसरात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून नियोजित ठिकाणाची पाहणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**श्रीक्षेत्र भीमाशंकर परिसरात ‘भीमाशंकर हेरिटेज वाडी’ विकसित करण्यात येणार आहे. मूळ गावापासून १५० मीटर अंतरावर सुमारे साडेदहा एकर क्षेत्रामध्ये ही ‘हेरिटेज वाडी’ असणार आहे. त्यामध्ये पारंपरिक वास्तुशैली आणि आधुनिक सुविधांचा समन्वय साधला जाणार आहे. या ‘हेरिटेज वाडी’मुळे भीमाशंकरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, भाविकांसाठी दर्जेदार सुविधा आणि पर्यटन विकासाला चालना मिळणार आहे.**



### प्रस्तावित ‘हेरिटेज वाडी’मध्ये काय?

प्रस्तावित ‘हेरिटेज वाडी’मध्ये वारसा प्रवेशद्वार, ग्रामपंचायत कार्यालय, सभागृह, सार्वजनिक सुविधा केंद्र; तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत. ‘लाइव्हलीहूड अपग्रेडेशन’ संकल्पनेंतर्गत नव्या वसाहतीचे नियोजन हे भाविक आणि पर्यटकांसाठी सेवा केंद्र म्हणून करण्यात येणार आहे. त्यामुळे स्थानिकांना पर्यटनाशी संबंधित विविध रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. मंदिर परिसरातील रहिवाशांचे नियोजनबद्ध पुनर्वसन करण्यासाठी ‘झीरो फ्रिक्शन मॉडेल’चा अवलंब करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविकांच्या गर्दीचे व्यवस्थापन, वाहतूक नियंत्रण, स्वच्छता आणि अन्य नागरी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

या हेरिटेज वाडी प्रकल्पाच्या जागेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पाहणी केली.

प्रकल्पाचा आराखडा, पुनर्वसन प्रक्रिया, तसेच स्थानिकांसाठी प्रस्तावित सुविधांची याबाबतची माहिती त्यांनी घेतली. या वेळी आमदार दिलीप वळसे-पाटील, बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, ‘भीमाशंकर येथील ‘हेरिटेज वाडी’ पाहण्यासाठी पर्यटक येतील असे हे गाव होणार आहे. या प्रकल्पामुळे भीमाशंकरच्या सांस्कृतिक वारशाचे जतन, ग्रामस्थांच्या जीवनमानात सुधारणा, भाविकांसाठी दर्जेदार सुविधा आणि पर्यटन विकासाला चालना मिळेल. तसेच परिसराचे परिवर्तन घडून येईल.’

‘ग्रामस्थांनी या प्रकल्पासाठी सहकार्य केले आहे. या परिसरातील १५० घरांना अन्य ठिकाणी जागा देऊन चांगल्या गावाची रचना करण्यात येणार आहे. त्यामुळे भाविक मंदिरासोबत गावातही जातील आणि गावाची अर्थव्यवस्था बदलू शकेल. रस्ते, ज्येष्ठ नागरिकांसाठी विद्युत वाहन, दुकानांची रचना, बस स्थानक आदींचे नियोजन करण्यात आले आहे. या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सुविधांमुळे भाविकांची संख्या वाढेल,’ असेही फडणवीस म्हणाले. भीमाशंकरचे धार्मिक आणि पर्यावरणीय महत्त्व याचा विचार करून विकास आणि संवर्धन यांचा समतोल राखत प्रकल्पाची अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

‘भीमाशंकर गावाचे नियोजित पुनर्वसन, भाविकांसाठी आधुनिक सुविधा आणि स्थानिकांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मूळ गावापासून १५० मीटर अंतरावर सुमारे साडेदहा एकर क्षेत्रात ‘हेरिटेज वाडी’ विकसित करण्यात येणार आहे. त्यामध्ये पारंपरिक वास्तुशैली आणि आधुनिक सुविधांचा समन्वय साधण्यात येणार आहे,’ असे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले.

‘स्थानिकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ४० हून अधिक व्यावसायिक युनिट्सची तरतूद करण्यात आली आहे. ‘विस्थापनाऐवजी पुनर्रचना’ या संकल्पनेवर आधारित हा प्रकल्प असून, ग्रामस्थांचे सामाजिक, सांस्कृतिक नाते अबाधित ठेवत जवळच्या परिसरातच पुनर्वसन करण्यात येणार आहे,’ असे डुडी यांनी स्पष्ट केले.

# पिंपरीच्या पोलीस आयुक्तांचा दणका! पिस्तूलाचा दुरुपयोग

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिस्तुलचा दुरुपयोग, विविध प्रकारचे दाखल असलेले गुन्हे, मुदतीत शस्त्र खरेदी न करणे, वृद्धत्व आलेल्या अशा १५ जणांचे पिस्तुल परवाने पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी रद्द केले आहेत. यामध्ये तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका माजी प्रभाग स्वीकृत नगरसेवकाचा समावेश आहे. तसेच सबळ कारणाअभावी ६८ जणांना शस्त्र परवाने नाकारले आहेत.**




### शस्त्र परवान्यांच्या गैरवापरावर प्रभावी अंकुश बसण्याची शक्यता

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या या निर्णयामुळे शस्त्र परवान्यांच्या गैरवापरावर प्रभावी अंकुश बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. शस्त्र परवाना हा केवळ प्रतिष्ठेचा विषय नसून त्यासाठी ठोस आणि कायदेशीर कारण आवश्यक असल्याचा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी, शस्त्राचा गैरवापर तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भविष्यातही अशीच कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी शस्त्र परवान्यासंबंधात कठोर धोरण अवलंबिले आहे. शस्त्र परवाना प्रकरणांच्या आढाव्यात १५ व्यक्तींचे पिस्तुल परवाने रद्द केले आहेत. ६८ नवीन शस्त्र परवाना मागणी करणाऱ्या व्यक्तींना शस्त्र परवाने नाकारले आहे. शस्त्र परवानाधारक मयुर काळुराम भोईर (वय ३०, रा.हिंजवडी), सुभाष भिकाजी सपकाळ (वय-७० वर्षे, रा.नवी सांगवी, पुणे), विजय नामदेव लांडे (वय-४८ वर्षे, रा. भोसरी, पुणे), साहिल राजेंद्र ढमाले (वय-३२ वर्षे, रा.देहुगाव, पुणे) आणि शांताराम दत्तात्रय चव्हाण, (वय-४१ वर्षे, रा.आंबेठाण, पुणे) यांच्याविरुद्ध शस्त्राचा दुरुपयोग केल्याने व इतर विविध प्रकारचे गुन्हे दाखल आहेत.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी या प्रकरणांची तात्काळ दखल घेऊन त्यांचे पिस्तुल परवाने रद्द करण्यासाठी प्राथमिक चौकशी सुरु करण्याचे आदेश दिले होते. चौकशीअंती परवानाधारक यांची कसुरी आढळुन आल्याने पाच परवानाधारक यांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहेत. शस्त्र परवाना मंजुर केलेल्या व्यक्ती, ज्यांनी विहित मुदतीत शस्त्र खरेदी केले नाहीत, अशा दोन शस्त्र परवानाधारक यांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहे. तसेच ज्या शस्त्र परवानाधारकांना वृद्धत्व आले मृत्यू झाला आहे अशा एकूण आठ परवानाधारक यांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आलेले आहेत. त्यानुसार १५ शस्त्र परवानाधारक यांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आलेले आहेत. नवीन शस्त्र परवाना प्राप्त करण्यासाठी पोलीस आयुक्तांकडे प्राप्त अर्जांपैकी एकूण ६८ व्यक्तींना शस्त्र परवाने नाकारले आहेत. या प्रकरणांच्या प्राथमिक चौकशीमध्ये नमुद व्यक्तींना शस्त्र परवाने मंजुर करण्यासाठी कोणतेही सबळ कारण, आधार नसल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांना शस्त्र परवाने नाकारण्यात आलेले आहेत. भविष्यात देखील शस्त्र परवान्यासंबंधात अशाच प्रकारे कडक धोरण अवलंबिले जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. विजय लांडे हे तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसकडून पिंपरी-चिंचवड महापालिकेचे माजी प्रभाग स्वीकृत नगरसेवक आहेत.



## भूमिका

**अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्षामुळे संपूर्ण जग चिंतेच्या वातावरणात सापडले. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीतील तेलवाहतुकीवर परिणाम झाल्याने जागतिक इंधन पुरवठा विस्कळीत झाला. जगातील मोठा इंधन आयातदार देश असलेल्या भारतालाही याचा मोठा फटका बसला.**

# युद्धविरामाची संधी; जागतिक अर्थव्यवस्थेला दिलासा



इंधन आणि गॅसच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाल्याने महागाईचा दबाव वाढला आणि अर्थव्यवस्थेसमोर नवे आव्हान उभे राहिले.

अशा परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धविरामाबाबत सकारात्मक हालचाली सुरू झाल्याची चर्चा दिलासादायक मानली जात आहे. प्रस्तावित शांतता करारात युद्ध थांबवणे, लॅबनॉनमधील संघर्ष कमी करणे, होर्मुझ सामुद्रधुनीतील वाहतूक पूर्ववत सुरू करणे, अमेरिकेने नौदल नाकेबंदी हटवणे तसेच इराणच्या सार्वभौमत्वाचा आदर राखणे अशा महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय इराणवरील तेल निर्बंध शिथिल करण्याबाबत आणि अणुकार्यक्रमासंदर्भात पुढील ६० दिवसांत चर्चेद्वारे तोडगा काढण्याचाही प्रस्ताव आहे.

कोणत्याही युद्धाचा शेवट हा चर्चेतूनच होतो. त्यामुळे दोन्ही देशांनी अहंकार आणि पूर्वग्रह बाजूला ठेवून परस्पर विश्वासाने पुढे जाणे आवश्यक आहे. युद्धातून केवळ मानवी जीवितहानी, आर्थिक नुकसान आणि सामाजिक अस्थिरता निर्माण होते. रशिया-युक्रेन संघर्षाने याचे उदाहरण जगासमोर ठेवले आहे. त्या युद्धाचे परिणाम आजही अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांवर आणि लाखो नागरिकांच्या आयुष्यावर दिसून येत आहेत.

भारतानेही स्वातंत्र्यानंतर अनेक संकटांचा यशस्वी सामना केला आहे. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेला नवी दिशा मिळाली. मंदी, महामारी, इंधन संकट आणि विविध आर्थिक अडचणी असूनही भारताने आपल्या लवचिक आर्थिक व्यवस्थेच्या बळावर विकासाची गती कायम ठेवली. मात्र जागतिक संघर्षांचा परिणाम भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेवर होणे अपरिहार्य आहे.

जर युद्धविरामाचा प्रस्ताव प्रत्यक्षात यशस्वी झाला आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील तेलवाहतूक सुरळीत झाली, तर जागतिक इंधन बाजाराला स्थैर्य मिळू शकते. त्याचा सकारात्मक परिणाम भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर होईल. महागाईचा दबाव कमी होण्यास मदत मिळेल आणि उद्योग, व्यापार तसेच सामान्य नागरिकांनाही दिलासा मिळू शकतो.

आजच्या अस्थिर जागतिक परिस्थितीत युद्धापेक्षा संवाद आणि शांततेचा मार्ग अधिक प्रभावी ठरू शकतो. दीर्घकालीन स्थैर्य, आर्थिक प्रगती आणि जागतिक शांततेसाठी परस्पर सहकार्य आणि मुत्सद्दीपणा हाच सर्वात योग्य पर्याय असल्याचे या घडामोडी पुन्हा अधोरेखित करतात.

## प्रासंगिक »

### स्वभाव आणि छंद


**'समानशीले व्यसनेषु सख्यम्' हे सुभाषित आपण वारंवार ऐकतो आणि त्याचे प्रत्यंतर समाजात वावरताना आपणाला येते. याच सुभाषिताचा दाखला देणारी ही कथा.**

एका साध्या संवादातून हा बोध आपणाला मिळेल. एकदा प्रचंड महापुरात नदीच्या पात्रातून दोन भांडी वाहत होती. त्यापैकी एक होते पितळेचे, तर दुसरे होते मातीचे. त्या पुरातुन वाहत जातानाच त्यांच्यात संवाद चालला होता. पितळीचे भांडे मातीच्या भांड्याला म्हणत होते, "अरे, इतका दुरून का चालला आहेस? ये ना माझ्याजवळ. दोघेजण हातात हात घालून जाऊ. कशी मजा येईल बघ तरी. मला डोळे भरून पाहता येईल आणि या प्रचंड वेग असलेल्या पाण्यापासून तुझं संरक्षणही करता येईल." मातीच्या भांड्याने पितळे-च्या भांड्याचे आभार मानून म्हटले, "कृपा करून कोणत्याही स्थितीत तू माझ्याजवळ येऊ नकोस. तुझीच मला सर्वात जास्त भीती आहे. तुझा थोडासा जरी धक्का मला लागला, तरी माझ्या ठिकऱ्या उडतील. तुझा माझा देहभाव भिन्न आहे."

- तात्पर्य : **भिन्न स्वभावाचे, छंदाचे लोक एकत्र कसे येणार ?**

आजची जेन झी (Generation Z) ही केवळ वयाने तरुण नसून विचारांनी, तंत्रज्ञानाच्या वापराने आणि सामाजिक जाणीवांनी वेगळी ओळख निर्माण करणारी पिढी आहे. साधारणपणे 1997 ते 2012 या कालावधीत जन्मलेले तरुण या पिढीत मोडतात.

# जेन झी : नव्या भारताच्या बदलत्या विचारांची पिढी



इंटरनेट, स्मार्टफोन आणि सोशल मीडियाच्या युगात वाढल्यामुळे ही पिढी 'डिजिटल नेटिव्ह' म्हणून ओळखली जाते. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कमी वेळेत अधिक काम करण्याची क्षमता ही तिची मोठी ताकद आहे.

मागील पिढ्यांच्या तुलनेत जेन झीचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक स्पष्ट आणि स्वतंत्र आहे. करिअर, शिक्षण, आर्थिक स्वावलंबन आणि वर्क-लाईफ बॅलन्स यांना ही पिढी प्राधान्य देते. केवळ नोकरी मिळवणे एवढाच तिचा उद्देश नसून, स्वतःची ओळख निर्माण करणे आणि अर्थपूर्ण आयुष्य जगणे हा तिचा प्रयत्न असतो.

ही पिढी सामाजिक प्रश्नांबाबतही अधिक संवेदनशील आहे. पर्यावरण संरक्षण, मानसिक आरोग्य, लिंगसमानता, सामाजिक न्याय आणि पारदर्शक प्रशासन यांसारख्या विषयांवर ती ठामपणे भूमिका मांडताना दिसते. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपले मत व्यक्त करणे, जनजागृती करणे आणि बदलासाठी आवाज उठवणे ही तिची वैशिष्ट्ये आहेत. त्यामुळे जेन झी ही केवळ डिजिटल जगात रमणारी पिढी नसून समाजातील बदलाची इच्छाही बाळगणारी पिढी आहे.

अर्थात, प्रत्येक पिढीप्रमाणे जेन झीसमोरही काही आव्हाने आहेत. सोशल मीडियावरील अवलंबित्व, माहितीचा अतिरेक, मानसिक ताण आणि सततच्या स्पर्धेचा दबाव या समस्यांनाही तिला सामोरे जावे लागते. तरीही नवीन कल्पना स्वीकारण्याची तयारी, बदलाशी जुळवून घेण्याची क्षमता आणि नव्या संधी शोधण्याची वृत्ती यामुळे ही पिढी वेगळी ठरते. आज जेन झीबद्दल विविध मतप्रवाह असले तरी ती केवळ 'मोबाईलमध्ये गुंतलेली' पिढी म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही. तंत्रज्ञान, सामाजिक जाणीव, सर्जनशीलता आणि नव्या विचारांची सांगड घालून भविष्य घडविण्याची क्षमता या पिढीत आहे. त्यामुळे जेन झी ही केवळ एका वयोगटाची ओळख नसून, बदलत्या काळाचे आणि नव्या भारताच्या आकांक्षांचे प्रतीक मानली जाऊ शकते. या पिढीला योग्य दिशा, संधी आणि विश्वास मिळाला, तर ती केवळ स्वतःचे भविष्य घडवणार नाही, तर देशाच्या विकासालाही नवी गती देईल. त्यामुळे जेन झीकडे टीकेच्या दृष्टीने नव्हे, तर तिची क्षमता ओळखून सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे.

## ।। अभंगवाणी ।।



सासुरियां वीट आला भरतारा ।
इकडे माहेरा स्वभावें चि ॥१॥

सांडवर कोणी न धरिती हातीं ।
प्रारब्धाची गति भोगूं आतां ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# महायुतीचे सर्व नगरसेवक संपर्कात

## नांदेडमध्ये महायुतीचे अमरनाथ राजूरकर मोठ्या मताधिक्याने विजयी होतील

महाईन्यूज । नांदेड

**महायुतीचे सर्व मतदार आम्हाला भेटले आहेत, शिवाय आम्हाला मदत करणारे सदृश्य आणि अदृश्य हात आहेत. निवडणूक पुर्णपणे एकतर्फी असून महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा ठाम विश्वास माजी मुख्यमंत्री खा.अशोक चव्हाण यांनी येथे वार्ताहर बैठकीत व्यक्त केला.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १२ वर्षांचा कार्यकाळ यशस्वीरित्या पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भाजप महानगर कार्यालयात आयोजित वार्ताहर बैठकीत खा.चव्हाण बोलत होते. राजूरकर यांच्या विजयाबाबत कुठलीही शंका बाळगण्याचे कारण नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भाजपा-राष्ट्रवादी-शिवसेना अशी आमची महायुती आहे, त्यामुळे महायुतीचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार यांच्याशी आमच्या चर्चा सुरू असल्याचेही ते म्हणाले.

विमानसेवेमुळे नांदेडची कनेक्टीव्हीटी वाढली आहे. सध्या सात विमाने सुरु आहेत. दिल्ली, हैदराबाद, गोवा, बंगळुरू, नागपूर आदी ठिकाणच्या पर्यटकांचे येणे-जाणे मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. कमीतकमी पैशांमध्ये प्रवास करण्यासाठी नागरिकांची चांगली सोय झाली आहे. भविष्यात नांदेडमध्ये मोठी गुंतवणूक होणार आहे. राष्ट्रीय महामार्ग तसेच रेल्वे मार्गाचे कामही वेगाने सुरू आहेत. नांदेड-लातूर रेल्वे मार्गाचे कामही प्रगतीपथावर असून येत्या काही दिवसांत त्याची रितसर औपचारिक घोषणा होण्याची शक्यता असल्याची माहितीही खा.चव्हाण यांनी दिली. नांदेडकडे शासनाचे लक्ष असून एक उभरते शहर म्हणून नांदेड उदयास येत असल्याचे ते म्हणाले.

एक विकसित आणि आत्मनिर्भर भारत घडविण्यासाठी मोदींनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. जनतेच्या विश्वासाच्या बळावर एनडीएचे सरकार देशातील २२ राज्यात कार्यरत आहे. मागील १२ वर्षात मोदी सरकारने ९० हून अधिक विमानतळे उभारली आहेत. वीज, इंटरनेट क्षेत्रात विक्रमी कामे झाली आहेत. मोदी सरकारच्या १२ वर्षांची वाटचाल ही दैदिप्यमान, प्रभावी असल्याचे सांगून खा. चव्हाण म्हणाले.

### मोदींनी पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला

देशाच्या पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर मोदी यांनी पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतला आहे. या १२ वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध क्षेत्रात जी क्रांती केली, ती जनतेच्या १४७ कोटी जनतेने अनुभवली असल्याचेही खा.चव्हाण म्हणाले. या वार्ताहर परिषदेला माजी मंत्री डी.पी. सावंत, महायुतीचे उमेदवार अमरनाथ राजूरकर, चैतन्यबापू देशमुख, संतुकराव हंबर्डे, किशोर देशमुख, प्रवीण साले आदींची उपस्थिती होती.

### कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या

मोदी सरकारने गेल्या १२ वर्षांत गरीब, शेतकरी, महिला, युवा आणि मध्यमवर्गीय नागरिकांसाठी अनेक कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबवल्या असल्याचे खा. चव्हाण यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ देशातील कोट्यवधी नागरिकांना प्रत्यक्ष मिळाला असून त्यामुळे सर्वसामान्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल झाल्याचा दावा त्यांनी केला. पायाभूत सुविधांच्या विकासामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीला नवी गती मिळाल्याचेही ते म्हणाले. भारताची जागतिक स्तरावरील प्रतिमा अधिक भक्कम करण्यामध्ये पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले.

# आमदार रोहित पवारांच्या आंदोलनाला काँग्रेसचा पाठिंबा

महाईन्यूज । मुंबई

**शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे उपोषण सुरू केले. राज्य सरकारने जाचक अटी रद्द करून सरसकट कर्जमाफी जाहीर करावी, जोपर्यंत मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग' सुरूच राहील, असा इशाराही रोहित पवार यांनी दिला.**




त्यांच्या या उपोषणाला आता काँग्रेसनेही जाहीर पाठिंबा दर्शवला असून पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ हेदेखील पंढरपुरात जाऊन उपोषणाला बसणार आहे. खुद्द सपकाळ यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्या संदर्भातील घोषणा केली आहे.

भाजपा आणि महायुती सरकारवर टीका करताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली शेतकरी कर्जमाफी ही फसवी असून जाचक अटींमुळे लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहावे लागणार आहे. त्यामुळे संपूर्ण कर्जमाफी करून सात-बारा कोरा करा, या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी पंढरपूर येथे सुरु केलेल्या उपोषणाला काँग्रेस पक्षाचा पाठिंबा आहे. त्यांनी केलेल्या मागण्या रास्त आहेत, त्या सरकारने तात्काळ मान्य करायला हव्यात. रोहित पवार यांच्या उपोषणस्थळी जाऊन मी सुद्धा उपोषण करणार आहे, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते माजी आमदार अनंत गाडगीळ हेदेखील उपस्थित होते.

दरम्यान, मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीत काँग्रेस उमेदवार मिनाक्षी नटराज यांचा अर्ज चुकीच्या पद्धतीने रद्द करून भाजपा व निवडणूक आयोगाने खासदारकी पदरात पाडून घेतली परंतु ज्या नोटीस वरून हा अर्ज बाद करण्यात आला होता ती नोटीसच आता तेलंगणातील न्यायालयाने रद्द केली आहे. आता मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणूक रद्द करून पुन्हा निवडणूक घ्या व नटराजन यांचा अर्ज रद्द करून त्यांचा निवडणूक लढवण्याचा अधिकार हिरावून घेतलेल्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यावर काय कारवाई करणार? असा प्रश्नही सपकाळ यांनी विचारला. ते म्हणाले की, भारतीय जनता पक्ष, निवडणूक आयोगाच्या मदतीने व्होटचोरी करता करता आता सीटचोरी करू लागला आहे, त्याचा प्रत्यय मध्य प्रदेशातील राज्यसभा निवडणुकीत आला आहे.

### सपकाळ काय म्हणाले ?

मिनाक्षी नटराजन यांनी माहिती लपवल्याचे कारण देत अर्ज बाद करण्यात आला पण ज्या फॉर्म २६ वर ही माहिती दिली नाही असा आक्षेप आहे, त्या पानावर अशा पद्धतीचा कोणताच कॉलम नाही मग ती माहिती तरी कशी दिली जाणार, हा प्रश्न आहेच. काँग्रेसने या प्रश्नी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली पण निवडणूक प्रक्रिया संपल्याने त्यात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला. मुळात जी नोटीस होती ती नोटीसच चुकीची असून नटराजन यांच्या त्याच्याशी काही संबंध नाही असे स्पष्ट करून तेलंगणातील न्यायालयाने ती नोटीसच रद्द केली आहे.

# ममता बॅनर्जींना सर्वात मोठा धक्का!

## खंदे समर्थक सुदीप बंडोपाध्याय थेट भाजप मंत्र्याला भेटले; TMC फुटणार?

महाईन्यूज । नवी दिल्ली

**तृणमूल काँग्रेसचे नेते आणि ममता बॅनर्जी यांचे खंदे समर्थक सुदीप बंडोपाध्याय यांनी शनिवारी केंद्रीय मंत्री भूपेंद्र सिंह यांची भेट घेतली. या बैठकीला तृणमूलच्या बंडखोर खासदार शताब्दी रॉय या देखील उपस्थित होत्या. तसंच, बंडखोर खासदारांच्या पत्रावरही त्यांनी सही केली आहे. इंडिया टुडेने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.**



लोकसभेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला (NDA) पाठिंबा देण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या तृणमूलच्या २० बंडखोर खासदारांच्या यादीत बंडोपाध्याय यांचे नाव नव्हते. बंडोपाध्याय यांच्या या भेटीवर तृणमूलचे आमदार कुणाल घोष यांनी प्रतिक्रिया दिली असून, त्यांचा "पक्ष बदलण्याचा इतिहास" असल्याचा टोला लगावला आहे.

ते म्हणाले, "ममता दीदींनी या लोकांना पदे आणि सन्मान दिला आणि हे लोक बदल्यात हेच देतात. सुदीप बंडोपाध्याय यांचा पक्ष बदलण्याचा इतिहास आहे. आम्ही आधीच सांगितले होते की ते योग्य व्यक्ती नाहीत आणि ममता दीदींची दिशाभूल करूनच त्यांचे राजकारण चालत होते. यासाठी मला एकदा पक्षातून निलंबितही करण्यात आले होते. मी त्यावेळी जे बोललो होतो ते आज खरे ठरत आहे."

हे बंडखोर खासदार लोकसभेच्या सभापतींना भेटण्यापूर्वी रविवारी पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदु अधिकारी यांची भेट घेणार आहेत. 'एएनआय'ने बंडखोर टीएमसी खासदार जगदीश बसुनिया यांच्या हवाल्याने म्हटले आहे की, "बंडखोर टीएमसी खासदार लोकसभेच्या सभापतींना भेटण्यापूर्वी दिल्लीत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांची भेट घेतील."

मात्र, लोकसभेच्या सभापतींना भेटणाऱ्या खासदारांची संख्या २० असेल असे त्यांनी स्पष्ट केले नाही. ते म्हणाले, "आम्हाला सोमवारची (१५ जून) तारीख लोकसभा सभापतींच्या भेटीसाठी मिळाली आहे. सर्व बंडखोर खासदार त्यांच्याकडे जातील, ते सर्व उद्या दिल्लीत येत आहेत. रविवारी (१४ जून) सर्व खासदारांची मुख्यमंत्र्यांसोबत (सुवेंदु अधिकारी) बैठक होईल आणि त्यानंतर आम्ही सोमवारी सभापतींकडे जाऊ... तिथे १९ खासदार उपस्थित असतील." या घडामोडींमुळे तृणमूल काँग्रेसच्या गोटात मोठी राजकीय खळबळ उडाली असून पक्षांतर्गत नाराजी उघडपणे समोर येत असल्याची चर्चा आहे. बंडखोर खासदारांच्या पुढील भूमिकेकडे राष्ट्रीय राजकारणाचे लक्ष लागले आहे. त्यांनी लोकसभा सभापतींसमोर नेमकी कोणती भूमिका मांडणार, याबाबत उत्सुकता वाढली आहे. तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून अद्याप या संपूर्ण घडामोडींवर अधिकृत भूमिका जाहीर करण्यात आलेली नाही. काही दिवसांत या प्रकरणामुळे पश्चिम बंगालच्या राजकारणात मोठे राजकीय बदल घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### संसदीय गोटात पडलेली फूट

यापूर्वी, बंडखोर टीएमसी खासदार काकोली घोष दस्तिदार यांनी उघड केले होते कि २० खासदारांनी लोकसभेत स्वतंत्र आसनव्यवस्थेची अधिकृत मागणी केली आहे. या पावलाकडे पक्षाच्या संसदीय गोटात पडलेली फूट म्हणून पाहिले जात आहे. २०२६ च्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसला मिळालेल्या निराशाजनक कामगिरीनंतर पक्षात अंतर्गत कलह वाढला आहे. याच पार्श्वभूमीवर ज्येष्ठ पक्ष नेते आणि ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय समितीमधील दरी अधिक रुंदावल्याचे दिसून येत आहे.

# युरेनियमचा साठा जमिनीखाली लपवून इराणने उद्ध्वस्त केले बोगदे

महाईन्यूज । इराण

**अमेरिका व इराण यांच्यात युद्ध समाप्तीसाठीचा करार लवकरच होणार असल्याची चिन्हे दिसत असताना एक मोठी अडचण समोर आली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इराणकडे असलेला समृद्ध युरेनियमचा साठा हवा आहे. युरेनियमचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी केला जातो.**



या पार्श्वभूमीवर एक महत्वाची माहिती समोर आली आहे. इराणने युरेनियमचा साठा कोसळलेल्या खाणी व बोगद्यांखाली दडवून ठेवल्याचे समोर आले आहे. इराणने खाणी, बोगद्यांमध्ये असलेला युरेनियमचा साठा जमिनीखाली लपवून ठेवला व त्यानंतर खाणी व बोगद्यांना हेतुपुरस्सरपणे उद्ध्वस्त केले. तसेच त्याच्या प्रवेशद्वारांवर भू सुरूंग पेरले आहेत, अशी माहिती समोर आली. CNN या वृत्तसंस्थेने अमेरिकन गुप्तचर यंत्रणेशी संबंधित सूत्रांच्या हवाल्याने ही माहिती दिली.

जवळपास अर्धा टन समृद्ध युरेनियम इराणने लपवले आहे. इराणने लपवलेले युरेनियम अत्यंत समृद्ध असून त्यापासून अणुबॉम्ब सहजपणे बनवता येतो. यांपैकी बहुतांश युरेनियम मध्य इराणमधील इस्फहान येथील उद्ध्वस्त झालेल्या बोगद्यांखाली दडवण्यात आले आहे. तर इतर युरेनियम हे इतरत्र ठिकाणी ठेवण्यात आले. याचा अर्थ युरेनियम जमिनीतून बाहेर काढण्यासाठी आता मोठ्या प्रमाणात खोदकाम हाती घ्यावे लागू शकते. लपवलेले युरेनियम बाहेर काढणे हे इराणसाठी देखील मोठे आव्हान ठरणार आहे, अशी माहिती अमेरिकेच्या 'यूएस नॅशनल न्युक्लिअर सेक्युरिटी ॲडमिनिस्ट्रेशन ऑफिस ऑफ न्यूक्लिअर मटेरिअल रिमूव्हल'चे माजी अध्यक्ष स्कॉट रॉकेर यांनी CNN ला दिली आहे. इराणकडे असलेला युरेनियमचा साठा हा अमेरिका व इराण यांच्यातील चर्चेच्या केंद्रस्थानी असून त्यावरच दोन्ही देशांतील युद्धसमाप्तीचा करार अवलंबून असल्याचे मानले जाते.

### करार झाला तरी दोन्ही देशांमध्ये तणाव कायम?

अमेरिका व इराण यांच्यात युरेनियम हस्तांतरणाचा करार झाला तर इराण अमेरिकेला सर्व युरेनियम साठा सोपवेल याची शक्यता कमी आहे. युरेनियम साठ्याचा काही भाग इराण अमेरिकेला देईल व उर्वरित भाग आपल्याजवळ नसल्याचे सांगेल, अशी शक्यता स्कॉर रॉकेर यांनी व्यक्त केली आहे. इराणने जर अशी भूमिका घेतली तर आता करार झाल्यानंतरही दोन्ही देशांमध्ये भविष्यात युरेनियमवरून वादविवाद सुरूच राहतील. उर्वरित युरेनियम साठा खाणींच्या खाली दबला गेल्याचे इराणने सांगितले तरी त्या साठ्यापर्यंत इराण पोहोचेल. सरतेशेवटी तो साठा इराणकडेच असेल, अशी शक्यता स्कॉट रॉकेर यांनी व्यक्त केली आहे.



# पुन्हा धमाल!

बॉलिवूडमध्ये कॉमेडी चित्रपटांचा पुन्हा एकदा जोरदार बोलबाला पाहायला मिळत आहे. 'वेलकम टू द जंगल'नंतर आता प्रेक्षकांच्या उत्सुकतेचा केंद्रबिंदू ठरलेल्या धमाल 4 चा ट्रेलर प्रदर्शित झाला असून सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा रंगली आहे. ट्रेलरमध्ये भरपूर विनोद, थरार आणि भन्नाट प्रसंगांची मेजवानी पाहायला मिळत आहे. यावेळी 'धमाल'ची मूळ टीम पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे. अजय देवगण, रितेश देशमुख, अर्शद वारसी, जावेद जाफरी आणि संजय मिश्रा हे कलाकार एका नव्या खजिन्याच्या शोधासाठी निघाल्याचे ट्रेलरमध्ये दिसते. मात्र, हा प्रवास जंगल, समुद्र आणि अनेक रोमांचक ठिकाणांमधून जात असल्याने प्रेक्षकांना पुन्हा एकदा धमाल अनुभवायला मिळणार आहे. ट्रेलरमधील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला तो म्हणजे अजय देवगणचा डॉल्फिनवर स्वार होतानाचा सीन. दुसरीकडे रितेश देशमुख आणि अर्शद वारसी यांची भन्नाट केमिस्ट्री पुन्हा एकदा हशा पिकवताना दिसत आहे. या चित्रपटात भोजपुरी सुपरस्टार रवी किशन खलनायकाच्या भूमिकेत झळकणार असून त्याचा 'देशी जॅक स्पॅरो' लूक सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्याची हटके स्टाइल आणि आगळीवेगळी व्यक्तिरेखा चित्रपटाबद्दलची उत्सुकता अधिक वाढवत आहे. दिग्दर्शक इंद्र कुमार यांच्या दिग्दर्शनाखाली साकारलेल्या या चित्रपटात जुन्या कलाकारांसोबतच काही नवे चेहरेही दिसणार आहेत. ईशा गुप्ता, संजीदा शेख, अंजली आनंद, उपेंद्र लिमये आणि विजय पाटकर यांसारखे कलाकारही महत्त्वाच्या भूमिकांमध्ये झळकणार आहेत.



# खुशीच ब्रेकअप?

खुशी कपूर हि एक बॉलीवूड अभिनेत्री आहे. काही वर्षांपूर्वी तिने चित्रपटसृष्टीमध्ये पर्दापण केले आहे खुशीने २०२३ मध्ये 'द आर्चीज'मधून या क्षेत्राकडे ती वळाली आणि त्यानंतर त्याच दरम्यान सहकलाकार अभिनेता वेदांग रैना आणि तिच्या नात्याबाबत अफवा पसरल्या होत्या कारण ते अनेकदा एकत्र दिसून आले तसेच दोन वर्षापासून त्यांच्या बाबत चर्चा सुरू आहे. मात्र आता काही दिवसापासून त्यांच्या ब्रेकरच्या अथवा पसरत आहेत. आतापर्यंत खुशी कपूर आणि वेदांग रैना यांनी या अफवांवर मौन बाळगले होते, पण आता वेदांग रैनाने त्यांच्या ब्रेकअपला अप्रत्यक्षपणे दुजोरा दिला आहे. वेदांग रैना आता त्याच्या एका आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. आणि त्या चित्रपटाचे नाव आहे 'मैं वापस आऊंगा' , या चित्रपटात शर्वरी वाघ सुध्दा काम करत आहे. तर हा वेदांग रैना सध्या त्याच्या चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यस्त आहे. तर याच दरम्यान मिडीयाशी बोलताना वेदांग रैना याने सांगितले की, मी कोणत्याही जोडप्याशी स्वतःला जोडू शकत नाही कारण मी नात्यात नाही." वेदांग रैनाकडून हे ऐकल्यानंतर, त्याचे बहुतेक चाहते विचारत आहेत, "त्याचे आणि खुशीचे ब्रेकअप झाले आहे का?" वेदांग रैना आणि खुशी कपूर या दोघानी 2023 मध्ये एकत्र काम केले होते.



# उर्फी जावेदची कमाई कशी वाढली?

टीव्ही अभिनेत्री आणि इंटरनेट पर्सनॅलिटी उर्फी जावेद तिच्या हटके पोशाखांमुळे नेहमीच चर्चेत असते. नुकतेच, तिने मनोरंजन क्षेत्रातील तिच्या खडतर प्रवासाविषयी मनमोकळेपणाने सांगितले. सोशल मीडियाने तिचे आयुष्य बदलण्यापूर्वी तिचे टेलिव्हिजनमधील दिवस किती कठीण होते, हेदेखील तिने उघड केले. सोहा अली खानच्या पॉडकास्टवरील एका मुलाखतीदरम्यान, उर्फीने खुलासा केला की, अनेक अडचणींचा सामना करूनही, स्टार बनण्याचे आणि मुंबईत आरामदायी जीवन जगण्याचे तिचे नेहमीच स्वप्न होते. तिने हेही सांगितले की, आपल्या अत्याचारी वडिलांपासून सुटका करून घेण्यासाठी ती घरातून पळून गेली होती. उर्फीने सांगितले की, तिने सुरुवातीला बॉलिवूड प्रोजेक्ट्ससाठी ऑडिशन देण्याचा प्रयत्न केला, पण लवकरच तिच्या लक्षात आले की कोणत्याही ओळखीशिवाय या इंडस्ट्रीमध्ये संधी मिळवणे अवघड आहे. मग तिथे काम मिळवणे सोपे जाईल या विचाराने ती टेलिव्हिजनकडे वळली. मात्र, तसे झाले नाही. टीव्हीवर तिला अनेकदा सहाय्यक भूमिकाच मिळत राहिल्या. टेलिव्हिजन इंडस्ट्रीमधील तिच्या अनुभवाबद्दल बोलताना उर्फी म्हणाली, "जर तुम्ही स्टार नसाल किंवा मुख्य भूमिकेत नसाल, तर तुम्हाला कोणीही समजून घेत नाही. जर तुम्ही सहाय्यक भूमिकेत असाल, तर तुम्हाला चांगली वागणूक मिळत नाही." टेलिव्हिजनमधून मिळणाऱ्या कमाईवर जगण्याबद्दल बोलताना ती म्हणाली, "मला नेहमीच प्रसिद्धीच्या झोतात राहायचे होते. पण मला घर सांभाळायचे होते, त्यामुळे महिन्याला ४०,००० रुपये पुरेसे होते. पण माझे समाधान होत नव्हते." त्यानंतर तिने सोशल मीडियावर प्रयोग करून पाहिले. 'बिग बॉस ओटीटी'वरील तिची एन्ट्री तिच्या करिअरमधील एक महत्त्वाचा टप्पा ठरली. तिने कचऱ्यापासून बनवलेल्या एका ड्रेसने ऑनलाइन सर्वांचे लक्ष वेधून घेतले आणि तिला रातोरात प्रसिद्धीच्या झोतात आणले. उर्फीने कबूल केले की तिने तिच्या सोशल मीडियावरील प्रतिमेबद्दल किंवा व्हायरल प्रसिद्धीबद्दल कधीही कोणतेही विशिष्ट नियोजन केले नव्हते. तिच्या मते, सर्व काही नैसर्गिकरित्या घडले. तिने हे देखील उघड केले की, जेव्हा ती टीव्ही इंडस्ट्रीमध्ये होती, तेव्हा ती दरमहा सुमारे ₹४०,००० कमवत असे, परंतु सोशल मीडियावर लोकप्रियता मिळाल्यानंतर, ब्रँड कोलॅबोरेशनमधून तिचे उत्पन्न दरमहा सुमारे ₹२ लाखांपर्यंत वाढले.

# डॅनीने शतक ठोकत रचला इतिहास!

## आई बनल्यानंतर अवघ्या २० दिवसांत ठोकलं शतक; चिमुकलीसाठी खास सेलिब्रेशन

**महाईन्यूज । बर्मिंगहॅम**

**आयसीसी महिला टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला जोरदार सुरुवात झाली आहे. यंदा वर्ल्डकप स्पर्धेच्या आयोजनाचा मान इंग्लंडकडे आहे. या स्पर्धेतील पहिलाच सामना यजमान इंग्लंड आणि श्रीलंका या दोन्ही संघांमध्ये पार पडला. पहिल्याच सामन्यात इंग्लंडची सलामीवीर फलंदाज डॅनियल वॅट हॉजकडून शतकी खेळी पाहायला मिळाली आहे. तिने ६२ चेंडूंचा सामना करत १३ चौकार आणि १ षटकाराचा सहाय्याने आपलं शतक पूर्ण केलं.**



या शतकी खेळीसह ती महिला टी- २० वर्ल्डकप स्पर्धेत शतक झळकावणारी सातवी महिला क्रिकेटपटू ठरली. तर इंग्लंडची दुसरीच क्रिकेटपटू ठरली. तिचं हे शतक आणखी खास ठरलं. कारण २३ दिवसांपूर्वीच तिने बाळाला जन्म दिला. आता शतक झळकावून तिने आपल्या बाळासाठी खास सेलिब्रेशन केलं. या सेलिब्रेशनचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

डॅनियल वॅट हॉजच्या घरी गेल्या महिन्यातच चिमुकलीचं आगमन झालं आहे. २० मे ला तिने मुलीला जन्म दिला. त्यानंतर महिनाही झालेला नसताना ती मैदानात उतरली आणि आपल्या देशासाठी टी-२० वर्ल्डकप खेळताना शतक झळकावलं आहे. डॅनियल वॅट हॉज ही लेस्बिअन असून तिने जॉर्जी वॅट हॉजसोबत २०२४ मध्ये विवाह केला होता. तिने शेवटच्या षटकात चौकार खेचून आपलं शतक पूर्ण केलं. दरम्यान शतक पूर्ण केल्यानंतर तिने आपल्या मुलीसाठी खास सेलिब्रेशन केलं. या सेलिब्रेशनला बेबी रॉक सेलिब्रेशन असं म्हणतात.

जॉर्जी आणि डॅनियलने आपल्या मुलीचं नाव डेजी असं ठेवलं आहे. या शतकी खेळीसह तिने अनेक मोठे रेकॉर्ड मोडून काढले आहेत. हे शतक तिने वयाच्या ३५ व्या वर्षी पूर्ण केलं आहे. यासह ती टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत शतक झळकावणारी सर्वात वयस्कर महिला खेळाडू ठरली आहे.

### इंग्लंडचा दमदार विजय

हा या स्पर्धेतील पहिलाच सामना होता. इंग्लंडने हा सामना जिंकून दमदार सुरुवात केली आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या इंग्लंडने २० षटकात १ गडी बाद २१९ धावांचा डोंगर उभारला. इंग्लंडकडून ॲमी जोन्सने ५३ तर डॅनियल वॅटने १०५ धावांची खेळी केली. या धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव १३२ धावांवर आटोपला. यासह इंग्लंडने हा सामना ८७ धावांनी आपल्या नावावर केला.

# वैभव सूर्यवंशीचं टी-२० पदार्पण लांबणीवर जाण्याची शक्यता

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**बीसीसीआयने आयर्लंड व इंग्लंड दौऱ्यासाठी टी-२० संघाची घोषणा केली आहे. सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरून बाजूला करत श्रेयस अय्यरच्या खांद्यावर संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी दिली आहे. यादरम्यान आयपीएल गाजवणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची संघात निवड करण्यात आली होती. वैभव आयर्लंडविरूद्ध मालिकेमधून भारतासाठी आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये पदार्पण करण्याची शक्यता होती. पण त्याचं पदार्पण लांबणीवर जाण्याची शक्यता दिसत आहे.**



भारताचा आगामी आयर्लंड दौरा अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बेलफास्टमध्ये सुरू असलेल्या अस्थिरतेमुळे या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या भारत-आयर्लंड टी-२० मालिकेच्या आयोजनाबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. गुरुवारी क्रिकेट आयर्लंडने जारी केलेल्या निवेदनात बेलफास्टमधील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवलं जात असल्याचं सांगितलं. तसेच, आयरिश सीनियर कप आणि नॅशनल कपसह देशांतर्गत स्पर्धांच्या भवितव्याबाबत पुढील ४८ तासांत निर्णय घेतला जाईल, असं स्पष्ट करण्यात आलं.

हा घडामोडींचा क्रम भारतीय संघासाठी महत्त्वाच्या टप्प्यावर समोर आला आहे. सध्या भारताचा संघ अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेची तयारी करत आहे. ही मालिका शनिवारी सुरू होणार आहे. अफगाणिस्तान मालिकेनंतर भारतीय संघ २६ आणि २८ जून रोजी बेलफास्ट येथे होणाऱ्या दोन टी-२० सामन्यांसाठी आयर्लंड दौऱ्यावर जाणार आहे. मात्र, बेलफास्टमधील सध्याच्या परिस्थितीमुळे या मालिकेच्या आयोजनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

भारत-आयर्लंड टी-२० मालिकेकडे क्रिकेटविश्वाचं विशेष लक्ष लागलं आहे. कारण या मालिकेत युवा फलंदाज वैभव सूर्यवंशीला आंतरराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळू शकते. निवड झाल्यास तो सचिन तेंडुलकरच्या नावावर असलेल्या ऐतिहासिक विक्रमालाही मागे टाकू शकतो. याच मालिकेद्वारे श्रेयस अय्यर याच्या भारताच्या टी-२० संघाच्या कर्णधारपदाच्या कारकिर्दीचीही सुरुवात होणार आहे.

मात्र, बेलफास्टमध्ये अलीकडच्या काही दिवसांत अस्थिरता आणि स्थलांतरितांविरोधातील हिंसक दंगली उसळल्या आहेत. शहरातील एका भीषण चाकू हल्ल्यानंतर ही परिस्थिती निर्माण झाली असून, त्यामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि अल्पसंख्याक समुदायांच्या सुरक्षेबाबतही चिंता व्यक्त केली जात आहे. परिस्थिती झपाट्याने बदलत असल्याने क्रिकेट आयर्लंड सर्व पर्यायांचा विचार करत आहे. सुरक्षा धोक्याची स्थिती कायम राहिल्यास सामने बेलफास्टऐवजी डब्लिन येथे हलवण्याचाही पर्याय चर्चेत असल्याचे समजते.

बीसीसीआयने अद्याप या प्रकरणावर कोणतंही वक्तव्य न केल्याने सध्या तरी भारताचा आयर्लंड दौरा नियोजित वेळापत्रकानुसार होणार असल्याचं मानलं जात आहे. मात्र, बेलफास्टमधील सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर आंतरराष्ट्रीय सामने सुरक्षितपणे आयोजित करता येतील का, याबाबतचा अंतिम निर्णय पुढील काही दिवसांत घेतला जाणार आहे. त्यामुळे येणारे दिवस या मालिकेच्या भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY
# महाईन्यूज™
ePaper
। रविवार ।
दि. 14 जून 2026 ।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# उन्हाळी सुट्टीनंतर १५ जूनपासून शाळा पुन्हा गजबजणार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या सर्व शाळा सोमवार, दि. १५ जून २०२६ पासून पुन्हा सुरू होणार असून नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांचे उत्साहपूर्ण वातावरणामध्ये स्वागत करण्यासाठी विशेष तयारी करण्यात आली आहे. विशेषतः इयत्ता पहिलीत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्याच दिवशी सर्व महापालिका शाळांमध्ये 'शाळा प्रवेश उत्सव' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.

शाळा प्रवेश उत्सवाच्या निमित्ताने महापौर रवि लांडगे,आयुक्त डॉ.विजय सुर्यवंशी यांच्यासह पदाधिकारी,नगरसदस्य अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाची उत्साहपूर्ण सुरुवात व्हावी यासाठी ते पालकांशी संवाद साधण्यात येणार आहे.

या प्रवेश उत्सवाद्वारे नव्याने शाळेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत आकर्षक पद्धतीने करण्यात येणार असून शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण मिळावे, यासाठी अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उप आयुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांचे औक्षण, स्वागत, पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन तसेच शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून स्वागत करण्यात येणार आहे.

तसेच, शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना बालभारतीची मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात येणार असून नवीन शैक्षणिक वर्षाच्या अभ्यासक्रमाची सुरुवात तत्काळ होण्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नवीन शैक्षणिक वर्ष सुरळीतपणे सुरू होण्यासाठी शिक्षण विभागामार्फत शाळा पूर्वतयारीची सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत. शाळा परिसराची स्वच्छता, वर्गखोल्यांची तयारी, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, बसण्याची सुविधा, डिजिटल शिक्षण साहित्य, शैक्षणिक साधनसामग्री तसेच शिक्षकांची उपस्थिती याबाबत आवश्यक नियोजन पूर्ण करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित, आनंददायी व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.




D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

*UG/PG Programs*
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.




Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य 'जनकल्याण शिबीर'!

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार; विविध योजनांचा लाभ एकाच छताखाली

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली केंद्र सरकारने राबवलेल्या विविध जनकल्याणकारी योजनांच्या यशस्वी १२ वर्षांच्या प्रवासानिमित्त भोसरी, पिंपरी-चिंचवड येथे आमदार महेश लांडगे यांच्या वतीने नागरिकांसाठी भव्य जनकल्याण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

सोमवार, दि. १५ जून २०२६ ते बुधवार, दि. १७ जून २०२६ या कालावधीत सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत हे शिबिर आमदार महेश लांडगे मध्यवर्ती जनसंपर्क कार्यालय, शितलबाग, पुणे-नाशिक रोड, भोसरी येथे पार पडणार आहे. या शिबिरामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध महत्वाकांक्षी योजनांची सविस्तर माहिती, नोंदणी तसेच थेट लाभ मिळवण्याची सुवर्णसंधी नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

या जनकल्याण शिबिरात ई-श्रम कार्ड नोंदणी, आयुष्मान भारत (PM-JAY) आरोग्य कार्ड, ABHA आरोग्य खाते, प्रधानमंत्री मानधन योजना, सुकन्या समृद्धी योजना, आयुष्मान भारत कुटुंब कार्ड आदी योजनांचा लाभ मिळणार आहे. या जनकल्याण शिबिराचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### महिलांसाठी विशेष पिंक ई-रिक्षा योजना

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी विशेष पिंक ई-रिक्षा योजना राबवली जाणार असून या योजनेत केवळ ₹5,000 डाउन पेमेंट, तीन दिवसांत थेट डिलिव्हरी, दरमहा ₹30,000 पेक्षा अधिक उत्पन्नाची संधी, मोफत प्रशिक्षण, चार्जिंग लायसन्स व विमा सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी वाहन परवान्याची आवश्यकता नाही.




> “केंद्र व राज्य शासनाच्या प्रत्येक जनकल्याणकारी योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे, हे माझे कर्तव्य आहे. पिंपरी-चिंचवड शहरासह संपूर्ण पीएमआर परिसराचा सर्वांगीण विकास, महिलांचे सक्षमीकरण, युवकांसाठी रोजगाराच्या संधी आणि सर्वसामान्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडविण्यासाठी मोदी सरकार काम करीत आहे. ‘विश्वास, विकास आणि जनकल्याण’ या मूल्यांवर चालत प्रत्येक नागरिकापर्यंत विकासाभिमुख हिंदुत्वाचा संदेश देण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.”
>
> – **महेश लांडगे, आमदार, भाजपा.**

---

# BJP ने ब्राम्हण समाजात स्वीकृत नगरसदस्य पदाची संधी द्या : डॉ. सचिन बोधनी

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदासाठी अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने तीन नावे आयुक्तांकडे सादर केली आहेत मात्र भारतीय जनता पार्टीच्या वतीने एकमत होत नसल्याने अद्याप नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत. येत्या सोमवारी दि. 15 जुलै रोजी होणाऱ्या सर्वसाधारण सभेत हा विषय मांडला जाणार असून एकूण दहा स्वीकृत नगरसेवकांची नावे जाहीर होण्याची प्रतीक्षा आहे.**




दरम्यान समस्त ब्राम्हण संघाच्या वतीने भाजपाकडून ब्राम्हण समाजाला स्वीकृत नगरसेवक पदाची संधी मिळावी अशी मागणी करण्यात आली आहे. याबाबत संस्थापक अध्यक्ष डॉ. सचिन बोधनी यांनी माहिती दिली असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये ब्राम्हण समाजाचे दोन लाखांहून अधिक नागरिक वास्तव्य करतात. शिवाय बहुतांश ब्राम्हण समाज हा सदैव भारतीय जनता पार्टीच्या ध्येय धोरणावर विश्वास ठेवून देशामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले आहेत, पिंपरी चिंचवड शहराच्या जडणघडणीमध्ये ही ब्राह्मण समाजाचा मोलाचा वाटा आहे विविध क्षेत्रांमध्ये ब्राह्मण समाजाच्या नागरिकांनी शहराचे व राज्याचे नाव उंचावले आहे.

शहराच्या विकासामध्ये योगदान देण्यासाठी तसेच सर्व समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने दिल्या जाणाऱ्या सात स्वीकृत सदस्यांमध्ये ब्राम्हण समाजाला एका स्वीकृत नगरसदस्य पदावर संधी द्यावी अशी मागणी समस्त ब्राम्हण संघांचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सचिन बोधनी यांनी केली आहे.

स्वीकृत सदस्य पदासाठी ब्राम्हण समाजाच्या वतीने ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार सातुर्डेकर, विवेक इनामदार, मिलिंद वैद्य, भाजप ज्येष्ठ कार्यकर्ते महेश कुलकर्णी, अतुल इनामदार इत्यादी असे अनेक मान्यवर हे पात्र असून त्यांचा या पदासाठी विचार व्हावा अशी मागणी डॉ. बोधनी यांनी केली आहे.

> पिंपरी-चिंचवडच्या जडणघडणीत ब्राम्हण समाजाचा मोलाचा वाटा असून हा समाज सातत्याने भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेशी प्रामाणिक राहिला आहे. पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवणाऱ्या या समाजाला स्वीकृत नगरसेवक पदावर न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, ही आमची ठाम मागणी आहे.
>
> – **डॉ. सचिन बोधनी, संस्थापक अध्यक्ष, समस्त ब्राम्हण संघ.**

# शाश्वत भविष्यासाठी 'हरित शपथ' अभियान

## वैयक्तिक व सामूहिक हरित उपक्रमांना मिळणार गुणांकन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**वसुंधरेचे संरक्षण, नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि शाश्वत जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत 'हरित शपथ' या ई-प्रतिज्ञा उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे.**



या माध्यमातून नागरिकांनी पर्यावरणपूरक सवयी अंगीकारून वसुंधरा संवर्धनासाठी आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

उपक्रमांतर्गत नागरिकांना माझी वसुंधरेच्या https://majhivasundhara.in/en/pledge/MQ%3D%3D या संकेतस्थळावर जाऊन वैयक्तिक अथवा सामूहिक स्वरूपात हरित शपथ घेता येणार आहे. पर्यावरण संरक्षणासाठी घेतलेल्या या ई-प्रतिज्ञा आणि त्यानुसार राबविण्यात आलेल्या कृतींच्या आधारे सहभागी व्यक्ती व गटांचे गुणांकन करण्यात येणार आहे.

वृक्षसंवर्धन, जलस्रोतांचे जतन, कचरा व्यवस्थापन, ऊर्जा बचत आणि स्वच्छता यांसारख्या उपक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढविणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. पर्यावरणपूरक जीवनशैलीचा स्वीकार करून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित व समृद्ध पर्यावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे आवश्यक असल्याचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी नमूद केले.

हरित शपथ ही केवळ प्रतिज्ञा नसून वसुंधरा संवर्धनासाठीची सामूहिक बांधिलकी आहे. या उपक्रमात सहभागी होऊन अधिकाधिक नागरिकांनी वसुंधरा रक्षणाच्या चळवळीत योगदान द्यावे, असे उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी यावेळी सांगितले.

> "वसुंधरा संवर्धन ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक बांधिलकी आहे. 'हरित शपथ' अभियानाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक सवयी रुजविण्याचा आणि शाश्वत विकासाची जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. अधिकाधिक नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन वृक्षसंवर्धन, जलसंधारण, कचरा व्यवस्थापन आणि ऊर्जा बचत यांसारख्या हरित कृतींमध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा. भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, हरित आणि समृद्ध पर्यावरण निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने सामाजिक बांधिलकीतून शपथ घ्यावी.
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**



## प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

स्वर्गीय सौ. नवल इंद्रमण सिंह जी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रियदर्शनी स्कूल, मोशी यांच्या वतीने दिनांक १३ जून २०२६ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. समाजसेवा आणि मानवतेचा संदेश जपण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमास Poona Serological Institute Blood Centre यांचे सहकार्य लाभले आहे.

रक्तदान हे सर्वोत्तम दान मानले जाते. एका रक्तदात्यामुळे अनेक गरजू रुग्णांना नवसंजीवनी मिळू शकते. या शिबिराद्वारे नागरिकांमध्ये रक्तदानाबाबत जागरूकता निर्माण करण्याचा तसेच समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

प्रियदर्शनी स्कूल सर्व पालक, माजी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी व परिसरातील नागरिकांना या सामाजिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून रक्तदान करण्याचे आवाहन करीत आहे. "आपले रक्तदान, कोणाचातरी जीवनदान" या संदेशासह समाजहितासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पिंपरी चिंचवडमध्ये १५ जणांचे शस्त्र परवाने रद्द तर ६८ अर्जदारांना नकार

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शस्त्र परवान्यांबाबत कठोर भूमिका घेत पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी मोठी कारवाई केली आहे. नुकत्याच घेण्यात आलेल्या आढावा बैठकीनंतर विविध कारणांमुळे १५ व्यक्तींचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले असून नवीन शस्त्र परवाना मागणाऱ्या ६८ अर्जदारांचे अर्जही फेटाळण्यात आले आहेत.**




पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, काही परवानाधारकांनी शस्त्रांचा गैरवापर केल्याचे तसेच त्यांच्याविरुद्ध विविध गुन्हे दाखल असल्याचे निदर्शनास आले होते. याची गंभीर दखल घेत प्राथमिक चौकशीचे आदेश देण्यात आले. चौकशीअंती संबंधित व्यक्ती दोषी आढळल्याने त्यांचे शस्त्र परवाने रद्द करण्यात आले.

यामध्ये हिंजवडी येथील मयुर काळुराम भोईर, नवी सांगवी येथील सुभाष भिकाजी सपकाळ, भोसरी येथील विजय नामदेव लांडे, देहूगाव येथील साहिल राजेंद्र ढमाले आणि आंबेठाण येथील शांताराम दत्तात्रय चव्हाण यांचा समावेश आहे.

तसेच शस्त्र परवाना मंजूर झाल्यानंतर विहित मुदतीत शस्त्र खरेदी न करणाऱ्या दोन परवानाधारकांचे परवाने रद्द करण्यात आले. याशिवाय वृद्धत्व किंवा मृत्यू झालेल्या आठ परवानाधारकांचे परवानेही रद्द करण्यात आले. अशाप्रकारे एकूण १५ शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहेत.

दरम्यान, नवीन शस्त्र परवान्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करताना ६८ अर्जदारांना शस्त्र परवाना मंजूर करण्यासाठी कोणतेही सबळ कारण अथवा आवश्यक आधार नसल्याचे आढळून आले. त्यामुळे त्यांचे अर्ज नामंजूर करण्यात आले असल्याचे आयुक्तालयाने स्पष्ट केले.

शस्त्र परवान्यांबाबत भविष्यातही अशाच प्रकारचे कठोर आणि नियमबद्ध धोरण कायम ठेवले जाईल, असे संकेत पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी दिले आहेत. या निर्णयामुळे शस्त्र परवाना प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि जबाबदारी निश्चित होण्यास मदत होणार असल्याचे मानले जात आहे.


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com
1
KM
From Talegaon Railway Station